REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 6 | MARCH - 2021

# मातंग समाज

डॉ. प्रतीक्षा गायकवाड,
मराठी विभागप्रमुख,पेमराज सारडा महाविदयालय,अहमदनगर.




स्वांत्र्योत्तर कालखंडात महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाच्या आणि परिवर्तनाच्या चळवळीत अलीकडे सहभागी झालेला समाज म्हणजे 'मांग समाज' होय. तो खेडयापाडयात 'मांग' या नावानेही ओळखला जातो. पुर्वीच्या काळात ग्रामव्यवस्थेमध्ये जी बारा बलुतेदार पध्दती अस्तित्वात होती. त्यामध्ये मातंग हा नंतरच्या काळात सामील झालेला बलुतेदार होय. परंपरेने त्याच्याकडून काही हक्क हिरावून घेतले असले तरी तो पारंपारिक असा जातिनिष्ठ विशिष्ट व्यवसाय करीत होता.

## मातंगांची पार्श्वभूमी :

'मातंग' या शब्दाचा अर्थ 'माग काढणारा' किंवा 'मार्ग दाखविणारा' किंवा 'मागून खाणारा' असा असल्याचे त्यांच्यातील काही लोक सांगतात. पुर्वीच्या काळी गुन्हयाचा आणि गुन्हेगारांचा माग काढणारा, नंतरच्या काळात गुन्हयाचा मार्ग दाखविणारा आणि त्यानंतरच्या काळात मागून खाणारा किंवा मागतकरी अशा त्याच्या जगण्याच्या त–हा आहेत. महाराष्ट्राबाहेर या समाजाला वेगळी नावे असलेली दिसून येतात. महाराष्ट्रात 'मातंग' कर्नाटकामध्ये 'मालेलू', आसाममध्ये 'माला' या नावाने हा समाज ओळखला जातो.

## मातंगांचे पोटविभाग :

इ.स. 1971 च्या जनगणनेनुसार मांगांमध्ये पाच पोटविभाग आढळतात. त्यात मांग, धनकानी मांग, राधे मांग, मांग गारोडी / मांग गारूडी, मांग मातंग हे पाच विभाग असून त्यातील धनकानी मांगांची संख्या विदर्भातल्या बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्हयात जास्त असलेली दिसून येते. मांग मातंग हे उस्मानाबाद, नांदेड, औरंगाबाद, परभणी, बीड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, पुणे, अहमदनगर, नाशिक, धुळे आणि जळगांव जिल्हयात जास्त आढळतात, तर मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड या जिल्हयांमध्ये कमी प्रमाणात आढळतात. (महाराष्ट्रातील जाती आणि जमाती)

## मांगांच्या पोटजाती :

मांगांच्या काही पोटजातीही आढळतात. यात ढाखणे, खानदेश, बेरा–या म्हणजे दख्खनचे, खानदेशचे आणि बेरार (विदर्भाचे) इ. प्रकार येतात. तर घोडके (घोडयांची देखभाल करणारे), डाफामे (डफ वाजविणारे), उचले (उचलेगिरी करणारे), पिंडारी (लूटमार करणारे), काकरकाढे (कंकर–दगड खणणारे), होले (चामडे काढणारे) आणि गारूडी (साप खेळवणारे) असे अनेक प्रकार आढळतात.

## मातंगांची कामेः

इतर जातींप्रमाणेच मातंग समाजाचीही पारंपारिक कामे ठरलेलीच दिसून येतात. उदा. घायपातापासून पाख तयार करणे, त्यापासून दोरखंड, नाडे आणि च–हाटे तयार करणे असे त्यांच्या कामाचे स्वरूप असे. याशिवाय पोळयाच्या सणाच्या दिवशी आंब्याचे तोरण गावच्या घरांना बांधणे, सवर्णांची बाई बाळंत झाली की तिच्याघरी मोळ (गवत) टाकणे, लग्नकार्यात हलगी वाजविणे, सनईसूर वाजविणे अशीही काही कामे मातंगांच्या वाटयाला आलेली दिसून येतात. या कामाच्या मोबदल्यात शेतक–याकडून वर्षाकाठी सुगीच्या हंगामात त्यांना काही प्रमाणात धान्य खळयावरच 'मात्र' मिळत असे, त्याला बलुतं असे म्हटले जात असे.

मातंगांच्या जाती–पोटजातींना स्वतंत्र व्यवसाय आहेत. कातडी रंगविणे, शिंपीच्या झाडाच्या फांदयापांसून पाटया तयार करणे इ. मराठवाडयात हा समाज बांबूपासून सुपे, टोपली, शिडया इ. वस्तू तयार करतो. याशिवाय हा समाज वाख, दोरखंड, सुतळया, केरसुण्या, कुंचे, शिंके तयार करताना दिसतो किंवा ते दारोदार भिक्षा मागून जगतात किंवा मनोरंजनाचे खेळ करून उपजीविका करतात.

## मातंग समाजाची परंपरा :

मातंग समाजाला फार मोठी, ऋषी मुनींची आणि लढवय्या राजाची परंपरा असल्याचे या समाजातील वृध्द सांगताना दिसतात. याच कारणास्तव मातंग समाजातील लोक स्वतःला उच्चकुलीन किंवा पराक्रमी समजतात. विशेषतः या समाजाचा मुळ पुरूष म्हणून 'मार्तंड ऋषी' असल्याचे सांगितले जाते. याशिवाय मातंग समाजाच्या वैभवी पराक्रमाचा पुरावा म्हणून रामायणाचाही दाखला दिला जातो. तो असा– तुंगभद्रेच्या काठी दंडकारण्यातील 'किष्किंधा' पर्वताच्या भोवताली मातंगांची साम्राज्ये होती. परंतु हे राजे अहंकारी आणि ऐतखाऊ असल्याने त्यांचा इतरांनी पराभव केला. त्यांना गुलाम केले. शुद्र बनविले. त्यांचीच प्रजा म्हणजे आजचा मातंग होय, अशीही कथा या समाजाचे काही वृध्द सांगताना दिसतात.

## मातंगांची आडनावे :

या समाजात काही कुलनामे /आडनावे असून कुळाच्या अंतर्गत विवाह केला जात नाही. यांच्यात कुळांची नावे आदमाने, कठाळ, जोगदंड, लोखंडे, कु–हेकर, भिसे, दिवटे, जाधव, मोरे, पारधी, पालाघ, सोमेश्वर इ. मात्र या समाजातील काही लोकांनी आडनावे बदललेली दिसून येतात.

## मातंग समाजाच्या रूढी–परंपराः

इतर समाजाच्या रूढी–परंपराप्रमाणे मातंग समाजाच्याही रूढी–परंपरामध्ये काही प्रमाणात भिन्नता आढळते.

### 1) विवाह प्रथा :

मातंग–मांगाशी इतर पोट– विभागातले मांग विवाह करीत नाहीत. दुस–या कुळात किंवा आडनावातल्या व्यक्तींशी त्यांचा विवाह हातो. या समाजातील पुरूषांना मावसबहिण व आत्येबहिणीशी विवाह करता येत नाही. दोन कुटुंबात फारच मित्रत्वाचे नाते असेल तर मुला–मुलींच्या जन्माच्या आधीच विवाह ठरवले जातात. मात्र अलीकडे ही प्रथा बंद झाली, असे समजते. या समाजात विवाहाकरिता मुलाची वयोमर्यादा 20 वर्षे तर मुलीची 14 ते 16 वर्षानंतरच असायची. पुर्वी मुलीच्या वडिलांना वधूमुल्य देण्याची प्रथा होती. परंतु आता मुलालाच हुंडा दयावा लागतो. तोही पैश्याच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात लग्नानंतर मुलगी मुलाच्या घरी राहायला जाते. ग्रामपंचायतीच्या परवानगीने त्यांना घटस्फोट घेता येतो व मुलीला नुकसान भरपाई ही देण्यात येते. अलीकडे कोर्टाकडूनही घटस्फोट घेता येतो. या समाजातील विधवा आणि विधूर हे विवाह करू शकतात. विधवा तिच्या पतीच्या वडील–भावाशी विवाह करू शकत नाही. मात्र ती पतीच्या लहान भावाशी विवाह करू शकते, फक्त त्याने तिच्या पतीच क्रियाकर्म केलेले नसावे. ही अट तिच्यासाठी होती.

### 2) दैवते आणि धार्मिक विधी :

मातंग समाज हा हिंदू धर्मीय समाज असल्याने हिंदू देव–देवतांचा तो उपासक आहे. अंबाबाई, जोखाई, मरीआई, म्हसोबा, लक्ष्मीआई, काळूबाई, खंडोबा आणि यल्लम्मा ही त्यांची दैवते होय. देव–देवतांकरिता मुले–मुली

सोडण्याची प्रथा मातंग समाजात रूढ असल्याचे दिसून येते. पूर्वीच्या काळी खंडोबाला वाघ्या–मुरळी सोडण्याची प्रथा होती. मात्र अलीकडच्या काळात मुरळी प्रथा बंद पडलेली पाहावयास मिळते. याखेरीज यल्लम्माला जोगे–जोगतिणी सोडण्याची आणि मरीआईला पोतराज सोडण्याची प्रथासुध्दा या समाजात अस्तित्वात असल्याचे आढळते. देवदेवतांच्या नावाने उपवास करणे, नवस करणे, कोंबडे–बकरे कापणे, जागरण–गोंधळ घालणे, देव वाढविणे हे देखील प्रकार धार्मिक रूढी–परंपरांमध्ये पाळले जातात.

**3) जत्रा :**

औरंगाबाद, नगरच्या भागात वरखडच्या आईचा जत्रा उत्सव म्हणून पाळला जातो. या जत्रेत वरखडच्या आईला रेडयाचा बळी देऊन प्रसाद दाखविला जातो, तिला 'रेडे–जत्रा' असे म्हणतात. चैत्री पौर्णिमेनंतर पाच दिवसांनी वरखेडे येथे दरवर्षी ही रेडेजत्रा साजरी केली जाते.

**4) आवस मागणे :**

या समाजात अमावस्येच्या दिवशी घरोघरी जाऊन भिक्षा मागण्याची प्रथा होती. तिला आवस मागणे असे म्हणत असत. मांगाला 'आवस वाढा' असे म्हणण्याची प्रथा आहे. मातंग व्यक्ती सवर्णांच्या प्रत्येक दारात जाऊन उभी राहत असे. तेव्हा सवर्ण लोक उरलेलं शिळ–पाकं अन्न, घरातला केरकचरा आणि केस मिसळून मांगाला वाढीत असायचे. त्यामागची कल्पना अशी सांगितली जाते की, अशाप्रकारचा केरकचरा व केसमिश्रित अन्न मांगाला वाढले असता घरातील इडापिडा जाते आणि सुख मिळते. आवस मागण्याच्या मागे मातंगांची एक वेगळी भूमिका असल्याचे दिसून येते. त्यांच्या मते, आवस मागणे हा आमचा पारंपारिक हक्क असून सवर्ण लोक आमचे देणेकरी आहेत.

**5) शिमग्यातील सोंगे :**

पुर्वी मातंग समाजातील लोक शिमग्याच्या सणांना वेगवेगळया प्रकारची वेशभूषा करून सोंगे काढीत असायचे. सवर्णांच्या दारोदारी जाऊन त्यांची करमणूक करायचे. तेव्हा शिमग्याच्या सणाची पुरणपोळी मांगांना मिळत असे (जाती आणि जमाती) या शिमग्याच्या सोंगातूनच पुढे या समाजातील तमाशे, वाजंत्री, ताफे आणि गायकी निर्माण झाल्याचे त्यांच्यातील काही वृध्दमंडळी सांगतांना दिसतात.

**6) ग्रहण मागणे :**

ग्रहण मागणे ही मातंग समाजातील आणखी एक प्रमुख परंपरा मानली जाते. ग्रहणाच्या दिवशी 'हे दान सुटे गिरान' किंवा 'मांगाला दान' असे ओरडून मातंग समाजातील लोक दान मागतात. त्यावेळी त्यांना सवर्ण लोक त्यांना दानाच्या रूपात जुने कपडे, अन्न किंवा पैसे देतात.

**7) सणोत्सवाचे महत्व :**

हिंदू धर्मातील प्रत्येक सणाला काही पौराणिक आणि दंतकथेचा आधार असलेला दिसून येतो.

**बैलपोळयाचा सण :**

बैलपोळयाच्या सणाच्या दिवशी शेतक–यांनी बैलांची पूजा करून त्यांना गोड–धोड खायला घालायचे, त्यांची गावभर मिरवणूक काढायची. या सणाच्या दिवशी मातंग लोक आंब्याच्या डहाळीचे तोरण सवर्णांच्या घराला बांधतात. त्या बदल्यात सवर्ण त्यांना पुरणपोळीचा प्रसाद वाढतात. मांगाने घराला तोरण बांधणे हे शुभलक्षण समजले जाते. ही प्रथा आजही खेडयात चालू आहे.

**दसरा :** दस–याच्या सणाला मातंगांना विशेष महत्व असते. याच दिवशी मांग लोक तांबडी माती आणि तरवडाच्या डहाळयाची पेंडी प्रत्येक सवर्णांच्या दारात ठेवतात. त्या मोबदल्यात, त्यांना धान्य व सणाचे अन्न वाढले जाते.

**दिवाळी :** दिवाळी सणाच्या वेळी मातंग स्त्री–पुरूष गावाच्या प्रतिष्ठित किंवा पाटीलांना ओवाळतात आणि 'इडापिडा जावो, बळीच राज्य येवो' असे म्हणतात. त्यावेळी गावचे पाटील आरतीच्या ताटात ओवाळणी म्हणून पैसे टाकतात अशी प्रथा आहे.

### 8) दंडवत घेण्याची प्रथा :

दंडवत किंवा लोटांगण घेण्याची प्रथा मातंग समाजात रूढ आहे. देवीला केलेल्या नवसाची फेड म्हणून स्वतःच्या घरापासून, सनई सुराचा ताफा लावून, नवीन कपडे घालून लोटांगण घेत, देवीच्या मंदिरात आले की केलेला नवस फिटतो अशी कल्पना या समाजात रूढ आहे.

चैत्र–वैशाखात देवीची जत्रा भरते, त्यादिवशी गोड नैवेद्य दाखवला जातो. मरीआईच्या मंदिराला, पाच फे–या मारल्या जातात. त्यावेळी मरीआईचे वारे पोतराजाच्या अंगात येते. पोतराज मरीआई पुढे घुमत राहतो. तेव्हा त्याला कोडी घातली जातात. दंडवत घेतलेली व्यक्ती त्याला साष्टांग नमस्कार करते, कोडी सोडविल्यावर नवस फिटतो, अशी कल्पना या समाजात रूढ असल्याचे दिसून येते.

### 9)'फुरमान सोयरं' म्हणण्याची प्रथा :

प्रत्येक समाजाची अभिवादन करण्याची एक वेगळी त–हा असते. महार समाजात जशी जोहार म्हणण्याची पध्दत होती. तशीच मातंग समाजात 'फुरमान सोयरं' म्हणण्याची प्रथा पूर्वी होती. (जाती आणि जमाती) मांगाने मांगाला 'फुरमान' म्हटले पाहिजे, असा आग्रह त्याकाळात असे. अलीकडे मात्रही प्रथा कमी झालेली दिसून येते.

### मातंगांची सांकेतिक भाषा :

इंग्रजांच्या काळात मातंग समाज हा गुन्हेगार समाज म्हणूनच ओळखला जात होता. त्या काळामध्ये या समाजात एक विशिष्ट प्रकारची बोली किंवा सांकेतिक भाषा बोलली जात होती. तिला 'चोरभाषा' असे म्हटले जात होते. या समाजात ही भाषा 'अंबजवाय' या नावाने प्रचलित होती. (जाती आणि जमाती) चो–यामा–या करतांना आपली भाषा इतरांना कळू नये, या कारणास्तव या भाषेचा वापर केला जात असे. ही त्यांची बोलीभाषा असली तरी या भाषेला लिपी नाही. उदा. डांडाळा (परका), दुतविण (खाणे) करपाटी (भाकरी), हिकब (चोरी), पेडला (गेला) इ. सारखे शब्द या भाषेत असून आजही या समाजातील काही लोक या भाषेचे उपयोजन करतांना दिसतात.

### जात–पंचायतः

इतर जाती–जमातीप्रमाणे मातंग समाजातही जात पंचायत अस्तित्वात होती. भांडण–तंटा, लग्नकार्ये, विधी, उत्सव यासारख्या कामांमध्ये जात पंचायतीचा मोलाचा वाटा असे. काडी–मोड देणे–घेणे किंवा सामाजिक गुन्हयाचा न्यायनिवाडा करण्याची कामे पंचायत करीत असायची.

या जातपंचायतीमध्ये पाच लोक पंच म्हणून काम करीत असत. त्यामध्ये 'म्हेत्रे' नामक समाजाचा व पंचायतीचा न्यायाधीश मानला जाई. याचे स्थान या समाजात राजाप्रमाणे असायचे. यातील दोन नंबरचा पंच चौगुला असून तो म्हेत्र्याचा सेवक किंवा प्रधान असायचा. तर तिस–या नंबरचा पंच म्हणजे तडफदार होय. तडफदाराला म्हेत्र्याचे जोडीदार मानले जात असायचे, तर उरलेले दोघेही या तिघांना त्यांच्या कामात मदत करायचे. असे हे पाच पंच जात–पंचायतीमध्ये मातंग समाजात न्यायनिवाडा करायचे. मात्र त्या काळात तो निवाडा बंधनकारक असला तरी अलीकडच्या काळात ही प्रथा बंद पडलेली दिसून येते.

### विवाहप्रथा :

प्रत्येक जिल्हयात मातंगांच्या लग्नाची पध्दत थोडयाफार फरकाने भिन्न–भिन्न असल्याचे आढळते. विशेषतः सोलापूर, बार्शी भागात लग्नविधीच्या वेळी मांडवात शिंदीच्या फोकापासून तयार केलेल्या छोटया बाळाला निजवण्याच्या दोन पाटया (हारे) ठेवल्या जातात. प्रत्येक पाटीमध्ये पाटा आणि वरवंटा ठेवून, नक्याला एका पाटीत पाटयावर, तर नवरीला दुस–या पाटीत पाटयावर उभे करून मगच लग्न लावले जाई. अशा पध्दतीने लग्नापुर्वी ब्राम्हण लावायचे परंतु अलिकडे याच समाजातील जाणते लोक लग्न लावतात.

आंबा हे मातंगांचे देवक असून लग्नप्रसंगी आंब्याच्या पानांना महत्व असायचे. मांडवाला आंब्याच्या डहाळया बांधून लग्ने लावली जायची.

पश्चिम महाराष्ट्रात काही जिल्हयात लग्नप्रसगी नवरदेवाची रेडयावर बसवूनच वरात काढण्याची प्रथा होती. लग्न पोषाखाच्या वेळीही नवरदेवाला रेडयावर बसवूनच हलगी आणि सनई सूरांच्या ताफ्यासह मारूतीच्या देवळाच्या आवारात नेले जात असे. तेथे त्याला नवीन पोषाख केला जाई. आणि पुन्हा रेडयावर बसवून वाजत गाजत लग्नमंडपात आणले जाई. मातंग समाजात रेडयावर बसवणे हे मोठेपणाचे आणि प्रतिष्ठेचे लक्षण समजले जात असे. मात्र गेल्या काही वर्षांपासून ही प्रथा बंद झाल्याचे समजते.

## पाचवीचा विधी :

प्रत्येक समाजाचा पाचवी पुजण्याचा विधी भिन्न आहे. या समाजात बाई बाळंत झाल्यानंतर पाच दिवसांनी सटवाई पूजनाचा वेगळा विधी केला जातो. यात पाचव्या दिवशी पाच छोटे दगड मांडून त्यांची हळदी कुंकवाने पूजा केली जाते. बाळ, बाळंतीण आणि पूजा केलेले दगड मांडून त्यांची पुन्हा पूजा केली जाते, तिला 'सटवाईची पूजा' असे म्हणतात.

## मर्तिका प्रथा :

मातंग समाजात माणसाच्या मृत्यूनंतर त्याला पुरण्याची प्रथा सुरू होती. पूर्वी गावगाडयात नवी पांढरी आणि जुनी पांढरी असे गावाचे दोन वेगवेगळे भाग पाडलेले असायचे. पैकी जुन्या पांढरीत मयताला पुरले जायचे. त्यानंतर पुरलेल्या ठिकाणी गुलाल आणि दूध घालून अगरबत्ती लावत असायचे. मग त्यावर गोमूत्र शिंपून, त्यावर एक मोठा दगड ठेवत असायचे. ती त्या मृताला ओळखण्याची खूण असायची. ही प्रथा आजही काही भागांमध्ये टिकून असल्याचे समजते. या समाजात मयताच्या तिस–या दिवशी सावडण्याचा विधी केला जातो. दहा दिवसानंतर दहावा घालून 13 दिवस सुतक पाळले जाते.

## धार्मिक समज :

पुराणकथेतील परशुरामाने रेणुकेचे शीर धडावेगळे केले आणि पुन्हा त्या धडाला मातंगीचे (मातंग स्त्रीचे) शीर जोडले. पुढे ती 'यल्लम्मा' या नावाने देवीरूपात प्रगटली. तेव्हा ती आपली देवी आहे, असे समजून जोगतीण म्हणून तिला मुली सोडण्याची प्रथा मातंग समाजात रूढ झाली, असा एक समज या समाजात आहे.

स्वांत्र्योत्तर काळात या समाजाची अवस्था काही प्रमाणात बदललेली दिसून येते. औद्योगिकीकरणाच्या लाटेत खेडयापाडयातल्या बलुतेदारी किंवा गावगाडा व्यवस्थेचे उच्चाटन झाल्यामुळे या समाजाचा बलुत्याचा आधार गेला. पारपारिक जात व्यवस्थांच्या आधारे त्यांना उदरनिर्वाह करणे अशक्य झाले. जातिनिष्ठ धंद्याला उतरती कळा आल्यामुळेच सवर्ण शेतकरी मातंगांचा जाच करू लागले. पर्यायाने खेडयातल्या हुशार तरूणांनी कामधंद्याच्या निमित्ताने शहराकडे धाव घेतली.

## सद्यःस्थिती :

मातंग समाजातील लाकांचे साक्षरतेचे प्रमाण हे कमी असून अंदाजे 90 टक्के लोक शिक्षित असल्याचे दिसून येते. या समाजातील लोक मिळेल ती मजुरी करून उदरनिर्वाह करताना दिसतात. गवंडी काम, बिगारी काम, भंगार गोळा करणे, टाकाऊ कागद, काचा गोळा करणे, डबा–बाटल्यांचा व्यवसाय करणे, सवर्णाच्या बंगल्यात सफाईचे काम करणे, मंडई, मार्केटमध्ये सफाई करणे किंवा महापालिकेत स्त्री–पुरूष सफाई कामगार म्हणून काम करतांना दिसतात. हा समाज बहुतेक करून अशिक्षित असल्याने आर्थिक, सामाजिकदृष्टया मागासलेला आणि अंधश्रध्दाळू असा आहे.

पुणे शहरातील मातंगांच्या एक लाख लोकसंख्येचा विचार करता केवळ शंभरात एखादी दुसरी व्यक्ती सरकारी निमसरकारी खात्यात नोकरी करतांना आढळते. ज्या व्यक्ती कायम स्वरूपातल्या नोकरी करतात, अशांची आर्थिक स्थिती बेताची दिसते. अशी माणसे क्वचितच सामाजिक कार्यात भाग घेताना दिसतात. सामाजिक अज्ञान, पारंपारिक अंधश्रध्दा आणि आर्थिक दारिद्रयामुळे मातंग समाज आजही मागासलेल्या अवस्थेत आढळतो. त्यांच्या किमान मूलभूत गरजांच्या गैरसोयीमुळे सामान्य मातंग माणसात उदासीनता जाणवते (जाती आणि जमाती)

शासनाच्या पातळीवरून दिल्या जाणा–या शैक्षणिक किंवा आर्थिक सवलतींचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने हा समाज थोडा जागृत झाल्यासारखा वाटतो. मात्र शहरात आलेल्या आणि थोडेफार शिकलेल्या लोकांखेरीज, अशिक्षितांना अशा सवलतींचा लाभ अजूनही घेता आलेला नाही. आज जी मातंग समाजाची सुधारणा दिसते आहे, ती केवळ सुशिक्षित, शिकलेल्या आणि नोकरी करणा–या लोकांमुळेच त्यांचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. उरलेले 95 टक्के सामान्य मातंग लोक आजही दारिद्रयरेषेखालीच जीवन व्यतीत करतांना दिसतात.